2017-18

ISSN 2349-638x
Impact Factor 3.025

श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे

# श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

व

## शिवाजी विद्यापीठ मराठी विभाग,
## शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ (शिविम)

यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा संवर्धन
पंधरवड्याचे औचित्य साधून

## एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र

शुक्रवार दि. १२ जानेवारी २०१८

- विषय -

**'आजच्या संदर्भात वैचारिक साहित्याची प्रस्तुतता'**

**'आज के संदर्भ में वैचारिक साहित्य की प्रासंगिकता'**

**'The Relevance of the Contemplative Literature of the Present Time'**



- संपादक -

डॉ. राजेखान शानेदिवाण

| आयोजक | श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे,<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | ISSN 2349-638x<br>Impact Factor 3.025 |
|---|---|---|

| Sr. No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No, |
|---|---|---|---|
| 55. | डॉ. शहनाज महेमुदशा सय्यद | समकालीन संदर्भ और कबीर काव्य की प्रासंगिकता | 263 To 267 |
| 56. | मदन नामदेव खरटमोल | वर्तमान जीवन संदर्भ में ममता कालिया के 'दौड' उपन्यास की वैचारिक भूमिका | 268 To 271 |
| 57. | डॉ.भास्कर उमराव भवर | सामाजिक परिप्रेक्ष्य में कबीर के काव्य का मुल्यांकन | 272 To 276 |
| 58. | डॉ. एस. के. खोत | आज के युग में कबीर के विचारों की प्रासंगिकता | 277 To 278 |
| 59. | डॉ.वर्षा गायकवाड | कबीर के साहित्य की प्रासंगिकता | 279 To 281 |
| 60. | सविता कृ. पाटील | कबीर के साहित्य की प्रासंगिकता | 282 To 286 |
| 61. | Dr. Namdev D. Patil | Theme of Meditation in the Poetry of A. K. Ramanujan and Nissim Ezekiel | 287 To 290 |
| 62. | Avishkar Kamble | Dalit literature for Social Justice | 291 To 293 |
| 63. | K.M.Desai | Impact of Karl Marx on Society and Literature | 294 To 296 |
| 64. | कु. भारती श्रीधर कोळेकर | महात्मा जोतीराव फुले यांचे स्त्रीविषयक विचार | 297 To 301 |
| 65. | डॉ. सुरेश वसंत शिखरे | शेतकरी चळवळ आणि ब्राह्मणेत्तर वैचारिकता | 302 To 306 |
| 66. | सौ. सुनिता विजय जाधव | एकोणिसाव्या शतकातील वैचारिक गद्य | 307 To 314 |
| 67. | डॉ. प्रशांत गायकवाड | सर्वोत्तम भूमिपुत्र : गोतम बुद्ध या ग्रंथातील काही बौद्ध स्त्रीव्यक्तिरेखा | 315 To 319 |
| 68. | डॉ. गोपाळ ओमाणा गावड | मामा वरेरकर यांच्या साहित्यातील वैचारिकता | 320 To 326 |
| 69. | प्रा. संभाजी धोंडीराम कदम | समाज प्रबोधनाची चळवळ | 327 To 332 |
| 70. | प्रा. सुजाता चोपडे | कबीर व तुकारामांच्या साहित्यातील वैचारिकता व प्रासंगिकता :एक अभ्यास | 333 To 335 |
| 71. | डॉ.सौ.एन.डी. काशिद-पाटील<br>डॉ. डी. एल. काशिदपाटील | प्राचीन भारतीय साहित्यातील भौगोलिक संकल्पनांचे आजचे महत्त्व | 336 To 339 |

| आयोजक | श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे,<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | ISSN 2349-638x<br>Impact Factor 3.025 |
|---|---|---|

# महात्मा जोतीराव फुले यांचे स्त्रीविषयक विचार

**कु. भारती श्रीधर कोळेकर**
मु. पो. पेठ वडगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**प्रस्तावना :**

प्राचीन काळापासूनच रूढी, परंपरा, चालीरिती इ. बाबतीत भारतीय संस्कृती सर्वश्रेष्ठ आहे असे मानले जाते. या संस्कृतीत विविध धर्म, पंथ, संप्रदाय, उपास्यदेवता, आचारविचार, तत्त्वज्ञान इ. बाबतीत भिन्नता असल्याचे दिसून येते. तरीही एका बाबतीत मात्र सर्व पंथ संप्रदायांमध्ये एकमत असल्याचे जाणवते. ते म्हणजे पुरूषांचे सुख हे साध्य असून स्त्री ही त्या सुखाच्या अनेक साधनांपैकी एक महत्त्वाचे साधन आहे. प्राचीन काळात ब्राह्मणग्रंथ, उपनिषदे, धर्मसूत्रे, कौटिल्याचे अर्थशास्त्र, मनुस्मृती, याज्ञवल्क्यस्मृती, नारदस्मृती, पुराणग्रंथ इ. मधून धर्मग्रंथ, रूढी, परंपरेच्या नावाखाली स्त्रियांना गौण स्थान दिले आहे. सण, उत्सव, परंपरा नातेसंबंधात तिला जखडून ठेवले. ‘चूल आणि मूल’ या कार्यक्षेत्रात बंदीस्त केले. शिक्षण, समता, स्वातंत्र्य यापासून तिला वंचित ठेवले. ‘लहानपणी वडीलांच्या, तरूणपणी पतीच्या व म्हातारपणी मुलांच्या ताब्यात तिने असले पाहिजे’ हा दंडक संस्कृतीने तिला घालून दिला होता.

सिंधूपासून नाईल पर्यंतच्या प्रदेशात मातृसत्ताक कुटुंब पद्धती अस्तित्वात होती. पुरूषप्रधान आर्य भारतात येण्यापूर्वी भारतातील अनार्यांमध्ये मातृसत्ताक पद्धती रूढ होती. या आर्य व अनार्यांमधील संघर्षात झालेल्या आर्यांच्या विजयानंतर आर्यांनी येथील मातृसत्ताक पद्धत मोडून तिचे शक्य तितके अंश दडपून टाकण्याचा कसा प्रयत्न केला याचे डॉ. आ. ह. साळुंखे यांनी ‘हिंदू संस्कृती आणि स्त्री’ या पुस्तकात अत्यंत नेमकेपणाने व परखड विवेचन केले आहे. यावरून एक गोष्ट लक्षात येते की, वैदिक आर्यसंस्कृतीपासूनच समाजात स्त्रियांना गौण स्थान मिळून पुरूषप्रधान संस्कृती रूढ झाल्याचे दिसते. नंतरच्या काळातही समाजव्यवस्थेत जातीव्यवस्था, धर्मग्रंथ इ. च्या प्रभावाने अनेक दोष निर्माण झाले.

**स्त्रीविषयक प्रचलित दृष्टिकोन :**

महात्मा फुलेंच्या काळातही स्त्रियांच्या बाबतीत अनेक समज-गैरसमज प्रचलित होते. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. त्यांना शिक्षण देणे म्हणजे धर्म व समाजाविरूद्ध वर्तन करणे तसेच स्त्रीने शिक्षण घेणे म्हणजे भ्रष्टाचार करणे मानले जात होते. तिने शिक्षण घेतले तर ती स्त्री कुमार्गास लागेल, घरच्या सुखात अडसर येईल, तिला अकाली वैधव्य येईल अशा काही खुळ्या समजुती रूढ होत्या. त्यांना चप्पल व छत्री वापरणेस बंदी होती. तिने घराबाहेर पडणे शिष्टसंमत नव्हते. चूल आणि मूल हेच तिचे कार्यक्षेत्र होते. वडीलधाऱ्यांसमोर नवऱ्याशी बोलणे असभ्यपणाचे मानत. नवऱ्याच्या पंगतीस जेवणे अपमानकारक होय. बालविवाह, कुमारी जरठ विवाह, केशवपन, सतीप्रथा इ. अनिष्ठ प्रथांना तिला सामोरे जावे लागे. स्त्री ही परतंत्र, अबला मानली जात असे. तिच्या एखाद्या कुकर्माबद्दल तिला फार मोठे शासन समाज करत असे. स्त्री ही दोषाची, अज्ञानाची खाण होय. तिला शिकविणे म्हणजे वेड्याच्या हाती कोलीत देण्यासारखे आहे. अशा या क्रूर व लज्जास्पद चालीरितींमुळे स्त्रियांची अवस्था दयनीय झाली होती.

प्राचीन काळापासूनच काही महामानवांनी तिच्यावरील अन्याय, अत्याचार दूर करण्यासाठी प्रयत्न केले. पण त्याची पाळेमुळे इतकी खोलवर रूजली होती की, त्याचा म्हणावा तितका परिणाम झाला नाही. आधुनिक काळातही स्त्रियांना जाचक बंधनांच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केले. ब्राह्मो समाज, परमहंस सभा, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज, आर्य समाज यांच्याकडून अनेक चळवळी सुरू झाल्या. राजा राममोहन रॉय, जगन्नाथ शंकरशेठ, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, वि. रा. शिंदे इ. समाज सुधारकांनी स्त्री मुक्तीसाठी प्रयत्न केले. त्यामध्ये महात्मा फुले यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांनी स्त्री शिक्षणास प्राधान्य देऊन केशवपन, सती, देवदासी प्रथेस विरोध, बालहत्या प्रतिबंधक गृह, बाल अनाथगृह, विधवा पुनर्विवाह, दुष्काळाच्यावेळी

अन्नछत्र, तसेच शेतकरी, कामगार, कष्टकरी वर्गाच्या कल्याणाबरोबरच शूद्रतिशूद्रांना वरिष्ठांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी कठोर परिश्रम घेतले. आपल्या लेखणी व कृतीतून एक वस्तुपाठ घालून दिला. त्यांच्या या कार्यामुळेच लोकमानसात त्यांचे स्थान श्रेष्ठ होते. तत्कालीन जनतेने त्यांना दिलेली 'महात्मा' ही उपाधी त्याचेच द्योतक म्हणता येईल.

**महात्मा फुले यांचे स्त्रीविषयक विचार :**

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत महात्मा फुलेंनी स्त्रियांना समता व मानवतेची वागणूक मिळावी म्हणून तसेच स्त्री ही समाजाचे मूळ आहे असे मानून त्यांनी स्त्री उद्धाराचे कार्य हाती घेतले. त्यांनी १८४८ मध्ये मुलींसाठी सुरू केलेली पहिली शाळा ही खऱ्या अर्थाने स्त्री–मुक्ती आंदोलनाची नांदी ठरली. त्या काळात स्त्रियांनी शिक्षण घेणे पाप समजले जात असे. स्त्रियांनी शिक्षण घेऊ नये म्हणून तिच्यावर अनेक बंधने लादली. त्यांना मानवी हक्काची जाणीव होऊ नये म्हणून पुरूषांनी स्त्रियांच्या शिक्षणावर बंदी घातली. हे सांगताना फुले म्हणतात, ''त्यास मानवी हक्क समजू देऊ नये या इराद्याने त्यांस विद्या शिकविण्याचा प्रतिबंध केला.''[१] तसेच शिक्षणाचा अभाव असल्यामुळे स्त्रिया स्वत:ला कशा कमी लेखतात हे जोतीराव फुले यांनी 'तृतीय रत्न' नाटकातील एका प्रसंगाच्या आधारे पटवून दिले आहे. ''आपल्या होणाऱ्या बाळाला शनिची पीडा होऊ नये म्हणून २३ ब्राह्मणांना तूप पोळ्याचे जेवण द्यावे.'' असे जोशाने सांगितले आहे असे बाईने सांगितल्यावर नवऱ्याने त्यावर तिला तिचे मत विचारले तेंव्हा ती म्हणते, ''मी बायकोमाणूस माझी बुद्धी ती किती? माझे मत तुम्हावर.''[२] यावरून माणसे शिक्षणाच्या अभावामुळे परावलंबी बनतात, न्यूनगंडाने कशी ग्रासली जातात. हे सांगताना त्यांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन किती योग्य होता याची प्रचीती येते.

स्त्रियांना शिक्षण देऊन त्यांची स्थिती सुधारावी म्हणून त्यांनी अनेक ठिकाणी जाऊन शाळांना भेटी दिल्या. तेव्हा हिंदुस्थानात स्त्री शिक्षणाकडे दुर्लक्ष करण्यात येते याचे दु:ख मिस फॅरारने व्यक्त केले. तेव्हा परदेशी लोक आपल्या देशसुधारणेसाठी प्रयत्न करतात पण आपले देशबांधव मात्र याकडे दुर्लक्ष करतात याची खंत त्यांना वाटली यावर उपाय म्हणून त्यांनी 'प्रत्येकाने आपल्या पत्नीस शिक्षण देऊन शिक्षणप्रसाराच्या कार्यात तिचे सहाय्य घ्यावे' असे ठरवून त्याप्रमाणे त्यांनी सावित्रीबाईंचे शिक्षण सुरू केले. मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. त्या शाळेत ज्या मुलांना शिक्षण घेण्याची आवड असेल त्यांनाही प्रवेश दिला. त्यांच्या मते, मुलांच्या भवितव्याचे मार्गदर्शन मातेकडूनच यशस्वीरितीने होऊ शकते. एका स्त्रीला शिक्षण दिले तर सर्व कुटुंबाला शिक्षण दिल्यासारखे आहे. त्यामुळे कुटुंबाची तर प्रगती होईलच पर्यायाने देशाचीही प्रगती होईल असे त्यांना वाटते. म्हणून त्यांना पुरूषांच्या शाळेपेक्षा स्त्रियांच्या शाळेची आवश्यकता अधिक महत्त्वाची वाटते.

जोतीरावांनी स्त्री शिक्षणातील स्त्री शिक्षिकेची अडचण ओळखून सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षिका बनविले. इतकेच नव्हे तर आपल्या लहान वयातील सुनेच्या शिक्षणाकडेही त्यांनी काळजीपूर्वक लक्ष दिले होते. हे त्यांनी आपल्या व्याह्यांना लिहिलेल्या पत्रातून अधिक स्पष्ट होते. त्या पत्रातील मजकूर असा होता. ''सध्या मुलीचा अभ्यास बरा चालला आहे. परंतु तिकडून आलेल्या लोकांस पाहिल्याबरोबर तिच्या अभ्यासाचा खोळंबा होतो. यास्तव अज्ञान, वायफळ मानसे जर पाठविणार नाही तर तुमची मोठी मेहरबानी होईल.''[३] प्रस्तुत पत्रामधून जोतीराव फुलेंची स्त्रीशिक्षणाविषयीची तळमळ तर दिसतेच त्याबरोबर आपल्या कुटुंबातील सर्वांच्या शिक्षणाकडे आपण किती गांभिर्याने लक्ष दिले पाहिजे हा संदेशही मिळतो.

स्त्रियांच्या शाळेत स्त्रियांनी शिक्षण देण्यामुळे अधिकाधिक स्त्रियांपर्यंत व अधिकाधिक कुटुंबांपर्यंत शिक्षण पोहचेल असे फुलेंना वाटत होते. स्त्रियांना स्त्रियांकडून शिक्षण देणे हे जोतीराव फुलेंच्या कार्याचे वेगळेपण होय. हे सांगताना गेल ऑम्व्हेट म्हणतात, ''शूद्र अतिशूद्र मुलींना शिक्षण देऊ पाहणारे जोतीबा फुले आणि मध्यमवर्गीय उच्च जातीय लोक या प्रकारच्या थरातील मुलींच्या शिक्षणासाठी प्रयत्न करणारे सुधारक त्यांच्या शिक्षण देण्याविषयीच्या एकूण

| आयोजक | श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे,<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | ISSN 2349-638x<br>Impact Factor 3.025 |
|---|---|---|

भूमिकेमध्ये फार मोठा फरक होता. स्त्रियांचे रोजचे काम म्हणजे चूल आणि मूल. तसेच शूद्रातिशूद्रातील स्त्रियांचे याशिवाय असलेले शेती / जातीचे इतर काम, त्यांचे धार्मिक काम म्हणजे पातिव्रत्याचे पालन! यासाठी स्त्रियांना शिक्षण देण्याची गरज त्या समाजातल्या ब्राह्मण धुरिणांना वाटत नव्हती.''[४] महात्मा फुलेंनी महाराष्ट्रामध्ये केलेल्या शैक्षणिक कार्यामुळेच त्यांना स्त्रीशिक्षणाचे आद्य जनक, क्रांतिकारक म्हणून ओळखले जाते.

त्या कालखंडात स्त्रियांना बालविवाह, कुमारीजरठ विवाह, बहुपत्नीकत्व, केशवपन, सती जाणे यासारख्या अनेक अनिष्ठ प्रथांना सामोरे जावे लागे. साहजिकच त्यावेळी समाजात विधवांची संख्या मोठी होती. महाराष्ट्रात तेव्हा विधवांच्या पुनर्विवाहासाठी १८४० पासूनच प्रचार सुरू झाला होता. एखाद्याची पत्नी वारली तर त्याला दुसरे तिसरे लग्न करण्यास परवानगी होती. याउलट जर एखाद्या स्त्रीचा पती वारला तर मात्र तिला दुसरे लग्न करायला प्रचलीत समाजव्यवस्थेने परवानगी दिली नव्हती. एकतर तिने नवऱ्याबरोबर सती जावे अथवा केशवपन करून विधवेचे खडतर जीवन जगावे अशी प्रथा अस्तित्वात होती. त्यावेळी समाजात ब्राह्मण विधवांचे खूप हाल होत. त्यामुळे त्यांचे मन अस्वस्थ झाले. अशा स्त्रियांचे हाल थांबावेत, त्यांच्या जीवनाला एक चांगली दिशा मिळावी म्हणून जोतीबांनी विधवा पुनर्विवाहाच्या चळवळीस सक्रीय पाठींबा दिला. लेखन व भाषणातून अशा अनिष्ठ प्रथांविरूद्ध आवाज उठविला व इ.स. १८६४ मध्ये पुण्यातील शेणवी कुटुंबातील विधवा व विधूर यांचा पुनर्विवाह घडवून आणला.

इतके करूनही जर एखादी विधवा एखाद्या पुरूषी वासनेचा बळी ठरली किंवा चुकून तिचे वाकडे पाऊल पडले तरमात्र तिला भ्रुणहत्या किंवा आत्महत्या करण्याशिवाय गत्यंतर नसे. अशा आपत्तीतून विधवांची सुटका व्हावी म्हणून जोतीबांनी इ.स. १८६३ मध्ये आपल्या घराशेजारी विधवांना गुप्तपणे येऊन बाळंत होण्यासाठी व मूल तेथे ठेवण्यासाठी 'बालहत्या प्रतिबंधक गृह' सुरू केले. त्याची माहिती देणारी भित्तीपत्रके घराघरावर लावण्यात आली. हस्तलिखित पत्रके वाटली. त्यामध्ये त्यांनी असा उल्लेख केला होता की, ''विधवांनो, इथे येऊन गुप्तपणे आणि सुरक्षितपणे बाळंत व्हा. तुम्ही आपले मूल न्यावे किंवा ठेवावे. हे तुमच्या खुशीवर अवलंबून राहील. त्या मुलाची काळजी हा अनाथाश्रम घेईल.''[५] त्यांनी सुरू केलेले हे बालहत्याप्रतिबंधक गृह हे भारतातील पहिलेच होते. पुढे त्यांनी या बालहत्या प्रतिबंधक गृहात जन्मलेला काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवेचा मुलगा दत्तक घेतला.

ज्या समाजव्यवस्थेने स्त्रियांना गौण स्थान दिले त्याच समाजव्यवस्थेत महात्मा फुलेंनी स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने शिक्षणाचा अधिकार दिला, समतेची वागणूक दिली. स्त्री व पुरूषांमध्ये कोणताही भेदभाव न करता त्यांना शिक्षण द्यावे, त्यांच्यासाठी शाळा सुरू कराव्यात, अशी समतेची उत्कट भावना पुढील अखंडातून ते व्यक्त करतात.

''स्त्री पुरूषांसाठी शाळा त्या घालाव्या।। विद्या शिकवाव्या भेद नाही।।३।।''[६]

तसेच

''मानवपदाची जरा आस धरा।। विद्वान ती करा।। मुलीमुले।।३९।।''[७]

या अखंडामधून मुलामुलींना शिक्षण न देणे म्हणजे एकप्रकारे माणुसकीला न शोभणारे आहे. असे सांगताना येथे 'मुलांबरोबर मुलींनाही शिक्षण देणे' त्यांना अभिप्रेत आहे. शिक्षणाच्या बाबतीतच नव्हे तर कौटुंबिक जीवनातही त्यांनी स्त्रीला समान दर्जा दिला. हे त्यांच्या स्वतःच्याच जीवनातील उदाहरणावरून समजून येते. महात्मा फुलेंना सावित्रीबाईपासून मूल झाले नव्हते. म्हणून त्यांच्या वडीलांनी प्रचलीत प्रथेप्रमाणे त्यांना दुसरा विवाह करण्याचा सल्ला दिला. तेव्हा त्यांनी वडीलांना प्रतिप्रश्न केला की, ''पहिल्या पत्नीपासून मुले नाही झाली म्हणून दुसरा विवाह करणे हा कोणता न्याय आहे? आणि जर हाच प्रस्ताव पत्नीकडून आला तर?''[८] त्यांच्या प्रतिप्रश्नाने व त्याप्रमाणे वागण्यामुळे सावित्रीबाईंना तर न्याय मिळालाच त्याचबरोबर स्त्री व पुरूष यांना समतेच्या एकाच तत्त्वाने तोलून तिच्याकडे बघण्याचा एक विधायक विचार व दृष्टिकोन फुलेंनी समाजास दिला.

| आयोजक | श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे,<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | ISSN 2349-638x<br>Impact Factor 3.025 |
|---|---|---|

त्यांनी स्त्रियांना केवळ शिक्षणाचा व समतेचा अधिकार दिला असे नाही तर त्याहीपुढे जाऊन त्यांनी स्त्रियांना एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून, एक माणूस म्हणून जगण्याचा अधिकार तिला दिला. तसेच समस्त पुरूषवर्गाला बघण्याचा एक विधायक दृष्टिकोन देताना 'सत्यशोधक समाजोक्त विवाहसंबंधी विधी' मधील वराने म्हणावयाच्या वधूविषयक 'मंगलाष्टक' मध्ये ते म्हणतात,

''स्थापाया अधिकार मी झटतसे, या बायकांचे सदा।।
खर्चाया मनी भी न मी किमपिही, सर्वस्व माझे कदा।।
मानितो सकला स्त्रियांस बहिणी, तू एकली मत्प्रिया।।
कर्त्याचे भय मी मनात तुजला, ठेवीन पोसावया।।''[९]

प्रस्तुत मंगलाष्टकातून महात्मा फुलेंची स्त्रीविषयक व्यापक व मानवतावादी वैचारिक भूमिका दिसून येते.

'स्त्रियां पुरूषांवर जास्त प्रेम करतात' याचे प्रमाण महात्मा फुले अतिशय चपखलपणे देतात. ते म्हणतात, एखाद्या स्त्रीचा नवरा मृत झाल्यात ती अतिशय दु:खी होऊन तिला फार संकटे सोसावी लागतात. मरेपर्यंत तिला एका विधवेचे जीवन जगावे लागते. पूर्वीतर कित्येक स्त्रियांना सतीदेखील जावे लागे. परंतु अशीच वेळ जर एखाद्या पुरूषावर आली तर त्याबाबत ते असे म्हणतात की, ''पुरूषाला तिच्याविषयी दु:ख होऊन ते कधी 'सता' गेलेला ऐकिला आहे काय? तो लागेल तितकी लग्ने करू शकतो. तशी स्त्रियांची स्थिती नाही.''[१०]

एकाच संसाराची दोन चाके असलेल्या स्त्री व पुरूषांना प्रचलीत समाजाने भिन्न-भिन्न नितीनियम केले. स्त्रीच्या वाटणीला तिच्या नवऱ्यामागे हालअपेष्टा सोसणे आले. तर पुरूषाने मात्र पत्नीच्या मृत्यूनंतर त्याला हवी तितकी लग्ने करावीत हे समाजमान्य होते. यावरून एक गोष्ट लक्षात येते की, स्त्रियांनी नवऱ्यामागे विरहात एकाकी व दु:खद जीवन जगणे असो वा सती जाऊन स्वत:चे जीवन पतीबरोबर संपविणे असो तिचे हे जगणे वा मरणे दोन्हीही नवऱ्यावरील प्रेमापोटीच करते. म्हणून स्त्रिया पुरूषांवर जास्त प्रेम करतात असे त्यांना वाटते.

महात्मा फुलेंनी सर्व प्राणीमात्रांमध्ये स्त्रीला श्रेष्ठ स्थान दिले आहे. त्यांच्या मते, स्त्री ही कोणत्याही तक्रारीशिवाय आपल्या पोटात मुलाचा नऊ महिने सांभाळ करते. त्याचे मलमूत्र काढण्यापासून त्याला चालण्या बोलण्यास शिकविते, त्याची सर्व प्रकारे काळजी घेते. हे काम फक्त स्त्रीच करते. म्हणून आपण इतर सर्व ऋणातून मुक्त होऊ पण तिच्या ऋणातून कधीही मुक्त होऊ शकत नाही. म्हणूनच त्यांच्या मते स्त्री ही पुरूषापेक्षा श्रेष्ठ आहे. तसेच त्यांनी सर्व प्राणीमात्रात मनुष्य व सर्व मनुष्यामध्ये स्त्रीला श्रेष्ठ स्थान दिले आहे. इतकेच नव्हे तर स्त्री व पुरूष दोघांनाही जन्माने स्वतंत्र मानले आहे व त्या दोघांनाही जीवनामध्ये समान अधिकार मिळावेत असे त्यांचे म्हणणे होते.

**समारोप :**

महात्मा फुलेंच्या स्त्री शिक्षण, विधवा विवाह, बालहत्या प्रतिबंधक गृह, स्त्री पुरूष समानता, तिच्याकडे पाहण्याचा मानवतावादी व विधायक दृष्टिकोन, समस्त मानवजातीतील स्त्रीचे श्रेष्ठ स्थान या सर्व विचारांवरून तसेच त्यांनी या अनुषंगाने केलेल्या कार्यामुळे स्त्रियांच्या जीवनात आमुलाग्र परिवर्तन घडविले. त्यांना शिक्षण, संपत्ती, वारसा, मालमत्तेचा हक्क, राजकीय क्षेत्रात सहभाग, परित्यक्ता स्त्रियांचे हक्क मिळवून दिले. अनिष्ठ प्रथा परंपरेच्या जोखडातून तिला मुक्त करून नव्या समाजाची पुनर्रचना करण्याचे काम केले. त्यांच्या या कार्यामुळेच त्यांना भारतातील स्त्री मुक्ती चळवळीचे कर्ते समाजसुधारक म्हणून ओळखले जाते. धनंजय कीर महात्मा फुलेंच्या कार्याचा गौरव करताना म्हणतात, 'महात्मा फुले हे अस्पृश्य मुलींसाठी शाळा सुरू करणारे पहिले भारतीय, आधुनिक भारतातील स्त्री शिक्षणाचे जनक, भारतीय स्त्रियांना अधिकार, स्वातंत्र्य, समता मिळवून देणारे उद्गाते होत.'

| आयोजक | श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | ISSN 2349-638x Impact Factor 3.025 |
|---|---|---|

**निष्कर्ष :**

१) महात्मा फुलेंच्या स्त्री विषयक विचारांमागे स्त्रियांना सोसाव्या लागणाऱ्या दु:खाबद्दल करूणा तसेच त्यांच्याप्रती समतत्त्वदृष्टी दिसून येते.

२) विधवा विवाह व बालहत्या प्रतिबंधक गृह स्थापनेमुळे स्त्रियांकडे बघण्याचा एक मानवतावादी दृष्टिकोन व विचार दिला.

३) महात्मा फुलेंनी शैक्षणिक कार्याद्वारे समस्त स्त्रीवर्गाला मानवी हक्कांचे भान व समतावादी दृष्टिकोन दिला.

४) त्यांच्या व्याह्यांबरोबरच्या पत्रव्यवहारातून कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाकडे गांभीर्याने पाहण्याचा जो दृष्टिकोन दिला तो सद्यस्थितीतही लागू पडणारा आहे.

५) त्यांच्या मंगलाष्टकातील विचार पुरूषांना पत्नीशी एकनिष्ठ राहण्याची दृष्टी व कर्तव्याची जाणीव करून देणारा आहे.

६) त्यांच्या स्त्रीविषयक विचारांनी समस्त प्राणीमात्रांमध्ये स्त्रीला श्रेष्ठ स्थान दिले आहे.

७) स्त्री शिक्षण व मुलांचे संगोपन यावरील विचारावरून कुटुंब व देशाच्या जडणघडणीत स्त्रियांचे मोलाचे स्थान आहे हे समजून येते.

८) महात्मा फुलेंच्या स्त्रीविषयक विचार कार्यामुळे स्त्रियांच्या जीवनजाणिवा अधिक प्रगल्भ बनून त्यांना एक विधायक दृष्टिकोन दिला.

९) महात्मा फुलेंच्या स्त्रीविषयक विचारांना वगळून कोणत्याही वाङ्मयप्रकारांचा अभ्यास करताना स्त्री स्वातंत्र्य, समता, स्त्री सक्षमीकरण या दृष्टीने करणे अपूर्ण ठरेल.

**संदर्भ ग्रंथ**

१) फडके य. दि. (संपा.). 'महात्मा फुले समग्र वाङ्मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पाचवी आवृत्ती, २८ नोव्हेंबर १९९१, पृ. ४४७.

२) तत्रैव, पृ. १०. (तृतीय रत्न)

३) तत्रैव, पृ. ५९२ (महात्मा फुलेंचा पत्रव्यवहार)

४) ऑम्व्हेट (डॉ.) गेल. 'जोतीबा फुले आणि स्त्रीमुक्तीचा विचार', लोकवाङ्मय गृह, मुंबई, सातवी आवृत्ती, मार्च २०१२, पृ. ९, १०.

५) कीर धनंजय. 'महात्मा जोतीराव फुले', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती, १९९२, पृ. १६७.

६) फडके य. दि. (संपा.). उ.नि., पृ. ५६९. (अखंडादी काव्यरचना)

७) तत्रैव, पृ. ६१५. (अखंडादी काव्यरचना)

८) नरके हरि (संपा.). 'महात्मा फुले साहित्य और विचार', महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन द्वारा उच्च व तंत्रशिक्षा विभाग, मंत्रालय, मुंबई, ३२, प्रथम संस्करण २८ नवंम्बर १९९३.

९) फडके य. दि. (संपा.). उ.नि., पृ. ४१७. (सत्यशोधक समाजोक्त विवाहसंबंधी विधी)

तत्रैव, पृ. ४४७. (सार्वजनिक सत्यधर्म)